## परिशिष्ट- ३

## खालील विषयांसंदर्भात नागरिक/ मतदानांना अवगत करणे

लोकशाही पंधरवडा साजरा करताना विविध विषयांवर जनजागृती करता येईल, त्यासाठी खालील विषयांवर विविध प्रकारचे संदेश तयार करून ते विविध माध्यमांतून नागरिक/ मतदारांपर्यंत पोहचविता येतील.

**लोकशाहीची मुलभूत तत्वे:**

नागरीकांचा सहभाग, समानता, राजकीय सहिष्णुता, जनतेशी उत्तरदायित्व, कामकाजातील पारदर्शकता, नियमित व मुक्त, निर्भय आणि निष्पक्ष निवडणुका, आर्थिक स्वातंत्र्य, सत्तेच्या दुरुपयोगावर नियंत्रण- सत्तेचे विकेंद्रीकरण, नागरिकांच्या हक्कांचा जाहिरनामा, निवडणुकीचा निकाल सर्वांनी मान्य करणे, मानवी हक्कांची जोपासना, बहुपक्षीय प्रणाली, कायद्याचे राज्य इत्यादी.

**राज्य निवडणूक आयोगाचे दायित्व:**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या मुक्त, निर्भय, निष्पक्ष व पारदर्शक पध्दतीने विहीत मुदतीत पार पाडणे. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांना निवडणूक लढण्यासाठी समान संधी उपलब्ध करून देणे.

**राज्य निवडणूक आयोगाची वैशिष्ट्ये:**

राज्य निवडणूक आयोग संविधानिक व शासनापेक्षा वेगळी व स्वतंत्र संस्था, भारत निवडणूक आयोगाच्या समतुल्य दर्जा आणि अधिकार, आयोगाच्या आवश्यकतेनुसार सर्व संसाधने (अधिकारी/कर्मचारी वर्ग, वित्त इ.) पुरविणे शासनास बंधकारक, कायद्यातील त्रुटी/ असंदिग्ध बाबींवर स्पष्टीकरण/ पुरक आदेश देण्याबाबतचे वैधानिक अधिकार, प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाकडे शासनाविरोधात रिट याचिका दाखल करण्याचे स्वातंत्र्य.

**स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व:**

सत्तेच्या विकेंद्रीकरणाला चालना, प्राथमिक शिक्षण, पाणी, रस्ते, पथदिवे, स्वच्छता, उद्याने, जन्म-मृत्यूच्या नोंदी करणे इत्यादी प्राथमिक सोयी- सुविधा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पुरविल्या जातात. यातून स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व लक्षात येते.

**मतदार जागृतीसाठी संदेश/ स्लोगन:**

- मतदान करा... लोकशाही बळकट करा!
- आम्ही करू मतदान... विकासात देऊ योगदान!
- प्रलोभनाला नाही पडणार बळी... लोकशाहीला देऊ बळकटी!

- माझं मत... माझी ताकद!
- माझं मत.... माझा आवाज!
- निशाणी मतदानाची... आपल्या अभिमानाची!
- निर्भय मतदान... देशाचा सन्मान!
- आम्ही जागृक मतदार... उघडू विकासाचं द्वार!
- आम्ही मतदार... विकासाचे भागीदार!
- नको वस्तू, नको पैसा... आहे उज्ज्वल भविष्याचा ध्यास!
- माझं मत बहुमोल... पैशात नाही होत त्याचं मोल!
- प्रलोभनाला बळी पडू नका... निर्भयपणे मतदान करा!
- नको सोसायटीला रंगरंगोटी, नकोत मोफत यात्रा, सहली... मतं आहे माझं बहुमोल, त्याचं नाही होत पैशात मोल!
- मतदार राजा... लोकशाहीचा धागा!
- मतदारा राजा जागा हो... लोकाशाहीचा धागा हो!
- मी मतदार राजा... गाव/ शहराचा भाग्यविधाता!
- एक मतानेही फरक पडतो... गाव/शहराचे नवनिर्माण होते!
- एक मत करू शकते गाव/ शहराचे नवनिर्माण
- माझं एक मत घडविल गावाचं/ शहराचं भविष्य
- आई- बाबा, माझ्या भविष्यासाठी मतदान करा

0-0-0